स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

(UGCC recognized, NAAC Re-accredited B++ grade stet University)

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर संलग्नित महाविद्यालयीन ग्रंथालयामध्ये सामाजिक माध्यमांचा उपयोग एक अभ्यास

आंतरविद्याशाखीय ग्रंथालय आणि माहितीशास्त्र विषयातील आचार्य पदवीसाठी सादर केलेला संशोधन प्रबंधाचा आराखडा.

संशोधक

श्री संजय महादेव देवकर

मार्गदर्शक

डॉ. उध्दव रामराव अघाव

श्री संत जनाबाई शिक्षण संस्थेचे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय गंगाखेड, जि. परभणी

संशोधन केंद्र

स्कुल ऑफ मिडिया स्टडिज,

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड,

२०२३

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर संलग्नित महाविद्यालयीन ग्रंथालयामध्ये सामाजिक माध्यमांचा उपयोग एक अभ्यास

१. प्रस्तावना :-

सध्या आपण माहिती तंत्रज्ञानाच्या युगामध्ये वावरत आहोत. या माहिती युगाचा प्रवर्तक संगणक आहे. या नवयुगात संगणक व इंटरनेट यांनी आपल्या जीवनात व जीवनपध्दतीत अमुलाग्र, मूलभूत व क्रांतीकारी बदल घडविले आहेत. या क्रांतीकारी परिवर्तनातून ज्ञान माहिती तंत्रज्ञान, परस्परसंवाद, विज्ञान संशोधन यासारख्या अनेक क्षेत्रातील नविन क्षितीजाना अंकित करणे शक्य झाले आहे. शिक्षण क्षेत्राबरोबरच अनेक ग्रंथालयांच्या कामकाजातही संगणकामुळे अमुलाग्र बदल होत आहेत इंटरनेटच्या उदयामुळे संवाद साधणे व माहितीचे आदानप्रदान सुलभ झाले आहे. भ्रमणध्वनी सध्या प्रत्येकाच्या हातात सहज उपलब्ध होत आहे संगणक आणि भ्रमणध्वनी यांच्या माध्यमातुन इंटरनेट सेवाच्या सहायाने सर्वसामान्य वाचकापर्यंत संवाद साधणे आणि माहिती पोहचविणे सहज शक्य झाले आहे..

सर्वच क्षेत्रामध्ये सोशल नेटवर्किंग वेबसाईट्स म्हणजेच सामाजिक माध्यमांचे जाळे असणारी विविध संकेतस्थळे आवश्यकतेनुसार निर्माण होत आहेत. सामाजिक माध्यमे हे एक संगणक पध्दतीवर आधारित तंत्रज्ञान आहे यातुन सर्वसामान्यांना आपले सामाजिक संबंध प्रस्थापित करणे तसेच संदेश, चलचित्र पाठविणे शक्य झाले आहे. उदा. व्हाटसअप, फेसबुक, ट्विटर, लिंकइडन इत्यादी.

शैक्षणिक ग्रंथालयामध्येही माहितिच्या देवाण घेवाणीसाठी सामाजिक माध्यमांचा वापर अपरिहार्य बनला आहे. सामाजिक माध्यमांच्या आधारे ग्रंथालये विविध प्रकारच्या माहिती सेवा प्रसारणसाठी आणि विपणनासाठी सामाजिक माध्यमांचा वापर करीत आहेत ग्रंथालयाच्या वाचकांना ग्रंथालयाची माहिती सहज, सुलभ, कमी वेळात कुठेही, कधीही, कमी खर्चामध्ये मिळु शकते. यासाठी ग्रंथालये आणि वाचकांनी सामाजिक माध्यमांचा प्रभावीपणे वापर शक्य झाले आहे.

याचाच आधार घेऊन प्रस्तुत संशोधनामध्ये, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर संलग्नित महाविद्यालयीन ग्रंथालयामध्ये ग्रंथपाल, अध्यापक आणि संशोधक विद्यार्थी या सामाजिक माध्यमांचा उपयोग कशा पध्दतीने करतात, कोणकोणती सामाजिक माध्यमे वापरतात याचा शोध घेणे या उद्देशाने प्रस्तुत संशोधन हाती घेतले आहे.

२. संशोधनातील कार्यात्मक संकल्पना / व्याख्या

२.१ पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ :

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर हे नविन नाव असून, या विद्यापीठाचे मुळ नाव सोलापूर विद्यापीठ असे होते. या विद्यापीठाची स्थापना १ ऑगष्ट २००४ मध्ये झाली. या अगोदर हे विद्यापीठ शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूरशी सल्लग्नित (http://www.su.digitalunersity.ac dated 24/08/2023)

२.२. संलग्नित महाविद्यालय :

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूरशी प्रशासकिय कामकाजाच्या दृष्टीने संलग्नित असलेली महाविद्यालये (मानकर, सुधाकर २०१७)

२.३. ग्रंथालय :

माहितीचे वितरण करणारी सेवा देणारी संस्था जी आपल्या संस्कृती व इतिहासाचा ठेवा असते. (सातारकर, सु.प्र., अघाव, उध्दव २०१३)

२.४. ग्रंथालयासाठी सामाजिक माध्यमे :

सामाजिक माध्यम हे एक संगणक पध्दतीवर अधारित तंत्रज्ञान आहे हे आभासी नेटवर्क आणि ग्रुप निर्माण करुन या माध्यमातुन विचार आणि सामग्रीची देवाण घेवाण करण्याची सुविधा प्रदान करतो. प्रत्येकाला आपली मते मांडण्याचे लिहिण्याचे स्वातंत्र्य असते गुगलच्या मते, "वेबसाईट आणि ॲप्स ज्या वापरकर्त्यांना सामग्री तयार आणि सामाजिक करण्यास किंवा सोशल नेकवर्किंगमध्ये भाग घेण्यास प्रवृत्त करतात" https://www.google.com (Dated 5 August 2023)

ग्रंथालयीन सेवा वाचकांपर्यंत पोहचविण्यासाठी सामाजिक माध्यमांना विशेष महत्व प्राप्त झालेले आहे. यामध्ये पुढील सामाजिक माध्यमे ग्रंथालय सेवांना चालना देण्यासाठी प्रेरित करतात.

२.४.१ फेसबुक - फेसबुक हे अत्यंत लाकप्रिय सामाजिक माध्यम आहे. ग्रंथालयातील - वाचकांना संवादसाधण्यासाठी, ऑडिओ व्हिडिओ तसेच ग्रंथालयीन माहिती पाठविण्यासाठी फेसबुकचा वापर करता येतो. https://www.facebook.com (Dated 3 August, 2023)

२.४.२ युट्युब - ग्रंथालयासंदर्भातील विविण परिसंवाद, कार्यशाळा व्याख्याने यासारखे उपकम युट्युबवारे राबवता येतात. तसेच वाचकांना नवनविन माहिती आणि ग्रंथालयीन सेवांची माहिती देण्यासाठी ग्रंथालये युट्युबचा वापर करू शकतात. https://www.youtube.com (Dated 3 August, 2023)

२.४.३ ट्विटर - ग्रंथालयात नव्याने येत असलेल्या ग्रंथाविषयी ट्विट करता येते, तसेच - ट्विटरचा वापर करून ग्रंथालये वाचकांपर्यंत पोहचु शकतात - https://www.mobile.twitter.com (Dated 3 August, 2023)

२.४.४ फ्लिकर - ग्रंथालयात नव्याने येत असलेल्या प्रधाच्या व नियतकालीकाच्या प्रतिमा किंवा फोटो फ्लिकरवर वितरित करण्यासाठी उपयोग होईल. https://www.flickr.com (Dated 5 August 2023)

२.४.५ इन्स्टाग्राम - हे एक महत्वपुर्ण माध्यम नावाप्रमाणेच इन्स्टंट आहे यामध्ये नविनतम माहिती वाचकांपर्यंत सहजपणे पोहचु शकतात. https://www.instagram.com

२.४.६ लिंक्डइन - ग्रंथालयांना त्यांच्या आवडीच्या विषिष्ठ क्षेत्रासंबधीत तज्ञांची माहिती लिंक्डइन द्वारे मिळु शकते . https://www.linkedin.com (Dated 5 August 2023)

२.४.७ व्हॉट्सअप व्हॉट्सअप हे सर्वात जलद आणि स्वस्त वाचकांपर्यंत ग्रंथालय सेवा पोहचविण्याचा सुलभ मार्ग आहे. यामध्ये वाचकांना प्राप्त झालेली माहिती, व्हिडिओ इतरांना निश्चितपणे पाठवऊण, लाईक आणि शेअर करतोच यामुळे वाचकवर्ग मोठ्या प्रमाणात वाढतोhttps://www.whatsapp.com (Dated 5 August 2023)

२.४.८ टेलिग्राम - या द्वारे ग्रंथालयातील माहिती पाठविणे, वर्कशॉप, सेमिनार व कॉन्फरन्स यासारखे कार्यक्रम तसेच चॅटिंग कॉलिंगही करता येते. म्हणुनच टेलिग्राम हे ग्रंथालयासाठी महत्वपुर्ण उपयोगी सामाजिक माध्यम आहे. https://www.telagram.org (Dated 5 August 2023)

३. संबंधित साहित्याचा संशोधन पूर्व आढावा :

सुबागी (२०२२) यानी त्यांच्या भारथीदासन विद्यापीठ तिरुचिल्लापल्ली येथे सादर केलेल्या संशोधन प्रबंधामध्ये तामिळनाडु कृषी विद्यापीठातील अध्यापक आणि संशोधक विद्यार्थ्यांकडुन सामाजिक माध्यमांचा वापर किती प्रमाणात केला जातो, सामाजिक माध्यमांविषयी जागरुकता व समज वापरण्याचे उद्देश, मोबाइल तंत्रज्ञानाचा अनुप्रयोग आणि सामाजिक माध्यम वापरातील अडथळे या बाबिचा अभ्यास केलेला आहे.

दिपक कुमार (२०२१): यांनी त्यांच्या कुरुक्षेत्र विद्यापीठात सादर केलेल्या संशोधन प्रबंधामध्ये ग्रंथालय आणि माहितीशास्त्रातील विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक माध्यमांची जागरुकता, उपयोग याचे संशोधन केलेले आहे. हे विद्यार्थी सामाजिक माध्यमांचा वापर अगदी सुलभतेने करीत आहेत व आपल्याकडील माहिती सामायिक करण्यात अधिक स्वारस्य दाखवत असल्याचे आढळले आहे. तसेच ग्रंथालय आणि माहितीशास्त्रातील संबंधित माहितीसह अपडेट राहण्यासाठी सामाजिक माध्यमांचा वापर करतात असे नमुद केले आहे.

निहाल आलम (२०२९) यांनी त्यांच्या संशोधन प्रबंधामध्ये भारतातील विद्यापीठ ग्रंथालयामध्ये सामाजिक माध्यमांच्या वापरातील अभाव, सामाजिक माध्यमांच्या वापरातील अंमलबजावणीतील तफावत, ग्रंथालय सेवा देताना सामाजिक माध्यमांच्या वापरातील सद्यस्थितीतीचे परिक्षण केलेले आहे. ग्रंथालयामध्ये सामाजिक माध्यमांचा वापर करण्यासाठीचे धोरण आणि संभाव्य अव्हाणे ओळखुन ग्रंथालय वापरकर्त्यासाठी आणि ग्रंथालय विकासाठी एक सर्वोत्तम पध्दती तयार केली आहे.

लिना सोनवणे (२०२३): भारती विद्यापीठ पुणे येथे सादर केलेल्या संशोधन प्रबंधामध्ये लिना सोनवणे यांनी ग्रंथपालन क्षेत्रामध्ये सामाजिक माध्यमे आणि त्यासबंधित तंत्रज्ञानाचा प्रभाव यावर संशोधन केले आहे. नविन तंत्रज्ञानाच्या वापरामध्ये सामाजिक माध्यमे आणि त्यासंबंधित तंत्रज्ञानाचा अभ्यास करणे, त्यांचे मुल्यमापन करणे, ग्रंथपालांना सामाजिक माध्यमांचा वापर करताना येणात्या विविध समस्या आणि माहितीचे मुल्यमापन करणे यासंबंधित संशोधन करण्याचा प्रयत्न केला आहे.

चव्हाण आणि चव्हाण (२०१६) यांनी त्यांच्या धारवाड विद्यापीठाशी संबंधित संशोधनामध्ये विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक माध्यमांच्या प्रभावाचा अभ्यास केला आहे. इंटरनेट आणि माहिती तंत्रज्ञानाच्या विकासामुळे सामाजिक माध्यमांच्या वापरात मोठया प्रमाणात वाढ झालेली आहे तसेच याचे काही फायदे तोटे यांचेही संशोधन केले आहे..

४. संशोधनाची उद्दिष्टे : प्रस्तुत संशोधनाची उद्दिष्टे पुढील प्रमाणे आहेत.

४.१. पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर कार्यक्षेत्रेतील महाविद्यालयीन ग्रंथालयीन सेवांमध्ये सामाजिक माध्यमांचा वापर या सद्य स्थितीचा अभ्यास करणे.

४.२. ग्रंथपाल, अध्यापक आणि संशोधक विद्यार्थी ग्रंथालय सेवांकरीता कोणती सामाजिक माध्यमे वापरतात.

४.३. ग्रंथालयीन सेवांसाठी उपयुक्त अशा सामाजिक माध्यमांचा शोध घेणे.

४.४. सामाजिक माध्यमांचा समाज जीवनावर होणारा परिणामा याची चर्चा करणे.

४.५. या अभ्यासाच्या अधारे योग्य त्यासूचना व शिफारशी सुचविणे.

५. संशोधनाची ग्रहीतके :

५.१ ग्रंथपाल, अध्यापक आणि संशोधक विद्यार्थी ग्रंथालय सेवांकरीता सामाजिक माध्यमाचा वापर मोठ्या प्रमाणात करीत आहेत.

५.२. ग्रंथपाल, अध्यापक आणि संशोधक विद्यार्थी करीता सामाजिक माध्यमांच्या वापरामध्ये जागरुकता निर्माण करण्यासाठी प्रशिक्षणाची आवश्यकता आहे.

५.३. ग्रंथालय सेवामध्ये सामाजिक माध्यमांचा उपयोग करताना त्यांची आव्हाने आणि अडथळयांचा शोध घेणे.

५.४. ग्रंथालय सेवांमध्ये सामाजिक माध्यमांचा सकारात्मक / नकारात्मक परिणाम.

६. संशोधन पध्दती आणि तंत्रे

या संशोधनामध्ये संशोधकाने सर्वेक्षण तंत्रज्ञानासह वर्णनात्मक संशोधन पध्दतीचा वापर केला जाणार आहे. ग्रंथपाल, अध्यापक आणि संशोधक विद्यार्थी यांच्याकडुन प्रश्नावली द्वारे संबंधित माहिती संकलित केली जाणार आहे. स्तरीय यादृच्छिक नमुना निवड पध्दतीचा वापर करुन माहिती संकलित केली जाणार आहे.

७. संशोधनाची व्याप्ति व मर्यादा

प्रस्तुत संशोधनामध्ये पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर कार्यक्षेत्रेतील पारंपरिक आणि व्यवसायीक अशा १३१ महाविद्यालयीन ग्रंथालयांचा समावेश करण्यात आला आहे. ९२० अध्यापक असून, ६५००० विद्यार्थी आहेत. यातील २५०० विद्यार्थी संशोधन करीत आहेत. संबंधित संशोधनामध्ये पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर सलग्नित ८० VDds महाविद्यालये निवडली जाणार आहेत. तसेच अध्यापक आणि संशोधक विद्यार्थ्यांमधून ५० टक्के नमुना निवड केली जाणार आहे.

८. संशोधनाचे महत्व आणि आवश्यकता

आज सर्वच क्षेत्रामध्ये सामाजिक माध्यमांचा उपयोग मोठया प्रमाणात होत आहे. या माध्यमातुन आपण सर्व जगाशी माहिती देवाण घेवाण, संपर्क साधणे, आणि आपल्या उद्योग व्यवसायाची जाहिरात करणे सहज सोपे झाले आहे म्हणूनच सामाजिक माध्यमे आपल्या दैनंदिन जीवनाचा भाग बनलेला आहे. शैक्षणिक ग्रंथालयामध्येही या सामाजिक माध्यमांचा ग्रंथालयीन कामकाजासाठी सुलभपणे उपयोग करणे शक्य झालेले आहे. यामध्ये व्हॉट्सअप, फेसबुक, युट्युब, इंन्स्ट्राग्राम, ट्विटर, लिंकडइन, फ्लिकर ईत्यादीचा वापर ग्रंथालयामध्ये अपरिहार्य बनला आहे. या माध्यमातून ग्रंथालयीन सेवा उपयोग कर्त्यापर्यंत पोहचऊन आपला वाचकवर्ग वाढऊ शकतो.

ग्रंथालयामध्ये सामाजिक माध्यमांच्या सहायाने सेवा देत असताना ग्रंथपाल, अध्यापक आणि संशोधक विद्यार्थी कोणती सामाजिक माध्यमे वापरतात, किती प्रमाणात वापरतात, सामाजिक या द्वारे कोणत्या सेवा दिल्या जातात, माध्यमांची गुणवत्ता तपासणे तसेच यामध्ये कोणते आडथळे आहेत का? याचा शोध घेतला जाणार आहे.

९. आंतरराष्ट्रिय सद्यस्थिती :

आंतरराष्ट्रिय स्तरावर इंटरनेट आणि भ्रमणध्वनिच्या वापरातील सुविधेमुळे सामाजिक माध्यमे अधिक लोकप्रिय होत आहेत. सद्या जगातील ६० टक्के लोक सामाजिक माध्यमांचा उपयोग करीत आहेत. दररोज सरासरी एक व्यक्ति २ तास २४ मिनिटे सामाजिक माध्यमांवर वेळ घालवत आहेत. बहुतांश लोक आपआपल्या क्षेत्रातील आणि वैयक्तिक माहिती प्रदान करण्यासाठी सामाजिक माध्यमे वापरत आहेत. आंतरराष्ट्रिय स्तरावर फेसबुक, व्हॉट्सअप, युट्युब, टिकटॉक आणि इन्स्टाग्राम हि सामाजिक माध्यमे सर्वात जास्त वापरली जातात. यामध्ये तुलनेने पुरुषांचे प्रमाण जास्त असुन, आंतरराष्ट्रिय स्तरावर युरोप खंडामध्ये सामाजिक माध्यमे सर्वात जास्त वापरली जातात. (http://www.smartinsight.com dated 28/08/2023)

१०. राष्ट्रिय सद्यस्थिती :

राष्ट्रिय स्तरावर आज भारतामध्ये सामाजिक माध्यमे सर्वांना आकर्षित करीत आहेत. विशेतः तरुण वर्गामध्ये याचे प्रमाण अधिक आढळते. माहिती तंत्रज्ञान आणि वैयक्तिक स्वरुपातील माहिती पाठविण्यासाठी सामाजिक माध्यमांचा उपयोग केला जातो. भारतातील सुमारे १५० दशलक्ष लोक सामाजिक माध्यमे आणि ईमेल सारख्या प्लटफॉर्मचे सक्रिय वापरकर्ते आहेत. भारतामध्ये सुमारे ४०० दशलक्ष सामाजिक माध्यमाचे सक्रिय वापरकर्ते आहेत. समाजामध्ये जागरुकतेचा प्रसार करणे, विविध लोकाशी संपर्क साधने, मनोरंजन, बातम्या आणि विविध सेवाचा प्रसार करणे अशा उद्देशाने वापर केला जातो. भारतामध्ये ९५ टक्के लोक सामाजिक माध्यमांसाठी दररोज सरासरी तीन तासापेक्षा अधिक वेळ घालवतात यामध्ये व्हॉट्सअप, फेसबुक, युट्युव, आणि इन्स्टाग्राम हि सामाजिक माध्यमे सर्वात जास्त वापरली जातात. (http://www.drishtiias.com dated 28/08/2023)

११- संशोधन विषय निवडण्याचे कारणः

ग्रंथालयामध्ये इंटरनेटचा वाढता प्रभाव, भ्रमणध्वनि सारख्या साधनांचा प्रसार, यामुळे सामाजिक माध्यमांचा वापर अपरिहार्य झाला आहे. शैक्षणिक ग्रंथालयामध्येही सामाजिक माध्यमांचा वाढता वापर लक्षात घेता या संशोधनामध्ये ग्रंथालयाचे वाचक आणि ग्रंथालये कोणती सामाजिक माध्यमे वापरतात, कोणत्या हेतुसाठी वापरतात याचा शोध घेण्यासाठी हा संशोधन विषय निवडलेला आहे.

१२. निष्कर्ष व शिफारशी

प्रस्तुत संशोधनामध्ये संशोधकाने संकलित केलेल्या माहितीचे विविध तंत्राच्या सहायाने माहितीचे मुल्यमापन करून, विश्लेषणाअंती निष्कर्ष काढले जाणार आहेत. या संशोधनातून प्राप्त झालेल्या निष्कर्षाच्या आधारे योग्य त्या शिफारशी करण्यात येणार आहेत.

१३. सारांश :

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर संलग्नित महाविद्यालयीन ग्रंथालयामध्ये ग्रंथालयीन सेवा देण्यासाठी ग्रंथपाल, अध्यापक आणि संशोधक विद्यार्थी यांच्याकडून सामाजिक माध्यमाचा उपयोग केला जातो का? कोणती सामाजिक माध्यमे वापरली जातात, किती प्रमाणात वापर केला जातो, कोणत्या कारणसाठी वापर केला जातो व त्यातील अडथळयांचा शोध घेणे या उद्देशाने संशोधन केले जाणार आहे.

१४. संभाव्य प्रकरण रचना:

१. प्रकरण पहिले - परिचय / प्रस्तावना

या पहिल्या प्रकरणामध्ये संपुर्ण संशोधन अभ्यासाची पार्श्वभुमी, समस्या विधान संशोधनाची उद्दिष्टे व्याप्ती व मर्यादा गृहितके आणि पुढील संशोधनाच्या दृष्टिने संशोधन अभ्यासाचे महत्व आणि शिफारशी करणे अपेक्षित आहे..

२. प्रकरण दुसरे - संबंधित साहित्याचा पुर्वाभ्यास

या प्रकरणामध्ये ग्रंथालये आणि सामाजिक माध्यमे यांच्या संबधित साहित्याचा पूर्वाभ्यासाचे अवलोकन करण्यात येणार आहे.

३. प्रकरण तिसरे - सामाजिक माध्यमांचा विकास

या प्रकरणामध्ये सामाजिक माध्यमाचा इतिहास, संकल्पना आणि विकास याबरोबरच सामाजिक माध्यमाचे प्रकार वापर आणि फायदे याचा आढावा घेतला जाणार आहे. तसेच सामाजिक माध्यमांचा ग्रंथालय सेवांवर होणारा परिणाम याचा अभ्यास केला जाणार आहे.

४. प्रकरण चौथे - साहित्य संकलन

या प्रकरणामध्ये पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर संलग्नित महाविद्यालयीन ग्रंथालये, ग्रंथालयीन सेवा साठी ग्रंथपाल, अध्यापक आणि संशोधक विद्यार्थी यांच्याकडून सामाजिक माध्यमांचा कसा उपयोग केला जातो, याचा आढावा घेतला जाणार आहे.

५. प्रकरण पाचवे संकलीत माहितीचे विश्लेशन आणि मुल्यमापन.

या प्रकरणामध्ये संशोधनाशी संबंधित संकलीत माहितीचे प्रमाणित चाचण्या व उपलब्ध विश्वासनिय साधनांच्या आधारे विश्लेषन आणि मूल्यमापन करणे अपेक्षित आहे.

६. प्रकरण सहावे - महाविद्यालयीन ग्रंथालयांना उपयुक्त सामाजिक माध्यमांचा प्रारूप आराखडा.

७. प्रकरण सातवे -निष्कर्ष व शिफारशी.

या प्रकरणामध्ये संशोधनाअंती निष्कर्ष व शिफारशी करण्यात येणार आहेत.

१५. संशोधन कार्याचे नियोजन

अ.न.	कार्याचे स्वरुप	प्रस्तावित कालावधी
१	संदर्भित साहित्य संकलन व वाचन	सहा महिने
२	प्रश्नावली तयार करणे व भरुन घेणे.	सहा महिने
३	महितीचे विश्लेषन करणे	सहा महिने
४	प्रबंध लेखन	सहा महिने
५	निष्कर्ष आणि शिफारशी मांडणे.	सहा महिने
६	संशोधन प्रबंध सादर करणे.	सहा महिने

१६. संदर्भसूची:

१. आगलावे, प्रदिप (२००८) संशोधन पध्दतीशास्त्र व तंत्रे.५ वी. आ. विद्या प्रकाशन, नागपूर.

२ कुंभार, राजेंद्र (डिसेंबर २०२ ते मे २०२१) उच्च शिक्षणातील नवप्रवाह नाशिक ज्ञानगंगोत्री य.च.म.मु. वि., नाशिक.

३. कोण्णूर, एम.बी., कोण्णूर, सुजाता, माणगावकर, उष: प्रभा (२००८) ग्रंथालय व माहितीशास्त्रकोश. डायमंड पब्लिकेशन्स, पुणे.

४. मानकर, सुधाकर (२०१७) दि महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठे कायदा : २०१६, अतुल पब्लिकेशन, पुणे

५. फडके, द.ना. (२०१०) ग्रंथालय संगणकीकरण आणि आधुनिकीकरण ४ थी आ युनिव्हर्सल प्रकाशन, पुणे.

६. निकोसे, सत्यप्रकाश., (२००७) ग्रंथालय आणि माहितीशास्त्र संशोधन पध्दती प्रज्ञा प्रकाशन, नागपूर:

७. सातारकर, सु.प्र., अघाव, उध्दव (२०१३) ग्रंथालय व माहितीशास्त्र परिभाषा कोश मराठी-इंग्रजी-मराठी. डायमंड पब्लिकेशन्स, पुणे.

8.Burkhardt,A.,(2010).Social Media Aguide for College and University Libraries : College and Research Libraries News.71(10,10-24).

9.Handa, sumeet .,Tyagi Sudhir.(2015) Social Media and Libraries: Current Trends and Future Challenges. Library research World 1(2)2015,pp.110-115.

10.Kothari,C.R.,(2006). Research Methodology : Methods And Techniques. 2nd Ed. New Age International (P) Limited, Publishers, New Delhi:

11.Krishnaswami,O.R.,Rangnatham,M.,(2014).Methodology Of Research In Social Sciences . 2nd Ed. Himalaya Publishing House,Mumbai.

12.Mamta & Kumar, N. (2022). The use of social networking sites (SNSs) by Kurukshetra University Kurukshetra library professional students and scholars: A case study. International Journal of Information Dissemination and Technology, 12(3), 120-124.

13.Mandalia, Shishir,. Patel, Rajesh,. Patel, Ankitkumar Sureshbhai,. (2023). Library Services through Social Media:Chaitanya Journal,Ahamadabad, OL. 4 ISSUE NO. 1

14.Nowsheeba, A.A.,(2017)Social Media and Library services : International Journal of Library and Information Services.6(2)23.

14.Padhan, Hrudayananda(2021). Use of Social Media Tools for Library Services during the Critical Condition of Covid-19 in University Libraries of Odisha, Library Waves,Volume 7, No. 2 (2021)ISSN 2455-2291 (Online),pp-110-117.

15.Solanki,S.K.,(2021).Use Of Social Media Today.Jaipur:Mark Publishers.

16.Urkudkar,S.H.,(2015).Online Social Networking. Satyam Publishers & Distributors, Jaipur.

17.Urkudkar,S.H., & Et.all. (2022).Encyclopedia Of Library And Information Science (Vol.4,pp.66-95). Satyam Publishers & Distributors, Jaipur.

1. https://www.facebook.com (Dated 3 August , 2023)
2. https://www.mobile.twitter.com (Dated 3 August , 2023)
3. https://www.youtube.com (Dated 3 August , 2023)
4. https://www.instagram.com (Dated 5 August 2023)
5. https://www.flickr.com (Dated 5 August 2023)
6. https://www.linkedin.com (Dated 5 August 2023)
7. https://www.pintrest.com (Dated 5 August 2023)
8. https://www.google.com (Dated 5 August 2023)
9. https://www.wikipedia.org (Dated 5 August 2023)
10. https://www.whatsapp.com (Dated 5 August 2023)
11. https://www.telagram.org (Dated 5 August 2023)
12. .(http://www.su.digitalunersity.ac dated 24/08/2023)
13. (http://www.smartlnsight.com dated 28/08/2023)
14. (http://www.drishtiias.com dated 28/08/2023)